केस नं. अर्ज डब्ल्यूसी नं. 9/2023
निशाणी यु–8

**अर्जदाराचा साक्षीदार क. 1 ची साक्ष <u>शपथेवर सुरु...</u>**

**<u>साक्षीदाराची शपथेवर सरतपासणी – अर्जदारातर्फे श्री. एस. के. हिवाळे वकील यांच्याव्दारे</u>**

01. मीं **<u>निशाणी यु–8</u>** वर पुराव्याचे शपथपत्र दाखल केलेले असुन त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे, त्यावर माझी सही आहे. अभिलेखावर यादी **<u>निशाणी क.यु–3</u>** सोबत एमएलसीची प्रत, एफआयआरची प्रत, फिर्याद, घटनास्थळ पंचनामा, पोलिसांनी वैद्यकिय अधिकारी यांना दिलेले पत्र, मरणोत्तर पंचनामा, शवविच्छेदन अहवाल इत्यादी कागदपत्रे दाखल केलेली आहेत. त्यांना **<u>नि. क. यु–9 ते यु–15</u>** देण्यात येत आहे. त्यांच्या वकिलांमार्फत सामनेवाला यांना पाठविलेल्या नोटीसच्या प्रती दाखल केल्या आहेत. त्या आता मला दाखवण्यात येत आहेत. त्यावर माझे वकिलांची सही आहे. मजकूर बरोबर आहे. त्याला **<u>नि. क. यु–16 व यु–17</u>** देण्यात आहेत. सदर नोटीस रजिस्टर पोस्टाने पाठविल्या होत्या. पोस्टाच्या पावत्या दाखल केल्या आहेत. त्यांना **<u>नि. क. यु–18 व यु–19</u>** देण्यात येत आहे. नोटीस सामनेवाला यांना मिळाल्याबाबत पोस्टाचे ट्रॅक रिपोर्ट दाखल केले आहे. त्याला **<u>नि. यु–20 व यु–21</u>** देण्यात येत आहे. अंतीम अहवालाची प्रत देखील दाखल केली आहे. त्यास **<u>नि. यु–22</u>** देण्यात येत आहे.

**<u>साक्षीदाराची शपथेवर उलटतपासणी – सामनेवाला क. 1 तर्फे श्री. ए. व्ही. राठोड वकील यांच्याव्दारे</u>**

02. पुकारले असता गैरहजर उलटतपास काही नाही.

**श्रवणोत्तर स्विकृत..**

SHIRISH SUDHAKAR SAHASRABUDHE

Digitally signed by SHIRISH SUDHAKAR SAHASRABUDHE
Date: 2024.08.02 11:02:16 +0530

औरंगाबाद
दि. 01/08/2024

(एस.एस.सहस्त्रबुध्दे)
न्यायाधीश
2रे कामगार न्यायालय, औ.बाद.